GoodLuck Page No.
Date

## १) शिवाजी महाराजांचे आरमारविषयक धोरण -

- **प्रास्ताविक -**

छत्रपती शिवाजीराजांनी दुरदृष्टीने मराठा आरमाराची स्थापना केली. सागरावर आपले वर्चस्व निर्माण केले. त्यामुळे त्यांना भारतीय आरमाराचा जनक (Father of The Indian Navy) म्हणून ओळखले जाते. सन 1658 मध्ये शिवाजी राजांनी कल्याण - भिवंडीचा प्रदेश काबीज केल्यानंतर त्यांच्या लक्षात आरमारचे महत्व आणि त्याची गरज ध्यानी आली. पुढील काही वर्षात कोकणातील बराचसा मुलुख त्यांनी जी काबीज केला. त्याच वेळी त्यांनी कोकणातील आपल्या रयतेचे रक्षण करण्यासाठी आरमार उभारण्याचा दृढनिश्चय केला.

- **आरमार उभारण्यामागील प्रमुख उद्देश:**

शिवाजी महाराजांनी पुढील उद्देशासाठी स्वतंत्र आणि सामर्थ्यशाली आरमार निर्माण करण्याचे धोरण स्वीकारले

### १) मिठाचा व्यापार :

शिवाजी महाराजांच्याकडे मिठाचा व्यापारासाठी त्यांना इंग्रजांच्याकडुन जहाजे भाड्याने घ्यावी लागत. परंतु अशी जहाजे भाड्याने ते नराजीने देत कारण मिठाच्या गोण्यामुळे लाकडास छिद्रे पडत त्यामुळे लाकुड खराब होत असे. तेव्हा आपली स्वतंत्र गलबते असावीत असे राजांना वाटू लागले.

### २) व्यापारास संरक्षण :

शिवकाळात मस्कत, मोचा या ठिकाणी शिवरायांची व्यापारी जहाजे असत. शिवाजी राजांचे व्यापारवाढीचे धोरण होते. त्यामुळे सागरावरील आपल्या व्यापाऱ्यांचे संरक्षण व्हावे म्हणून त्यांनी लढाऊ जहाजे बांधून त्यास आरमाराचे बळ देण्याचे ठरविले आणि चाचेगरीपासून व्यापाराचे संरक्षण केले.

### ३) लष्करी वर्चस्व निर्माण करण्यासाठी :

महाराजांचे पायदळ आणि सामर्थ्यशाली होतेच. पण सागरावर आपले सामर्थ्य निर्माण झाले म्हणून त्यांनी आरमार उभारले. त्यामुळेच स्वराज्याच्या किनाऱ्यावरील मुलूखाचे संरक्षण करता आले.

### ४) शत्रूपासून प्रजेच्या संरक्षणासाठी :

जंजीराचे सिद्दी हे मराठ्यांचे कट्टर शत्रू होते. त्यांच्याकडुन वारंवार कोकण किनाऱ्यावरील मुलूखास मोठाच उपद्रव होत असे. ते कोकण किनाऱ्यावरील गावे आणि शेते लुटून फस्त करत. बचावदा निरपराध प्रजेला वेठीस धरत. लोकांच्या कत्तली करत. त्याचबरोबर अनेकांना गुलाम म्हणून पकडुन नेत. कोकणातील आपल्या प्रजेचा त्रास कमी करून त्यांच्या

Scanned by CamScanner

जीवीताचे रक्षण करण्यासाठी महाराजांनी आरमारी सत्तेची स्थापना करण्याचे ठरविले.

5) गिरीगांची अनूकुलता :

कोकणची किनारपट्टी मराठा आरमाराच्या उभारणीसाठी अनूकुल होती. कल्याण - भिवंडी येथे जहाजे बांधण्यासाठी लागणारे सागवान लाकूड मोठ्या प्रमाणात उपलब्ध होते. किनाऱ्यावरील नैसर्गिक खाड्या आणि बंदराची अनुकुलता उपयोगी ठरली. कोळी आणि भंडारी या पिढ्यानपिढ्या राहणाऱ्या दर्यावर्दी लोकांचे साहाय्य मिळणार होते.

6) पोर्तुगीज कारागिरांची मदत :

आरमार - बांधणीसाठी आवश्यक असणारे कुशल कारागीर महाराजांच्या जवळ नव्हते. पण आरमार उभारणीसाठी त्यांनी कुशल पोर्तुगीज कारागिरांची या कामी मदत घेतली. कल्याण व भिवंडी येथील आरमार बांधणी कारखान्यात ३०० पोर्तुगीज कारागिर काम करु लागले. त्यांनी मराठा आरमारातील पहिली वीस लढावू जहाजे बांधून दिली.

रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्र या ग्रंथात शिवाजीराजांचे आरमार सिध्दतेचे धोरण विशद करताना असे म्हणतात की आरमार म्हणजे स्वतंत्र राज्यांगच होय. जैसे ज्यास अश्वबळ त्याची पृथ्वी प्रजा आहे. तद्वत ज्याच्याजवळ आरमार त्याचा समुद्र. या करिता आरमार अवश्यमेव करणे.

## शिवाजी छत्रपतींच्या आरमाराची व्यवस्था :

1) जहाजांचा आकार :

छत्रपती शिवाजी राजांच्या आरमारातील जहाजांचा आकार ना फार मोठा ना फार लहान न ठेवता तो मध्यम आकाराचा असल. याबाबत रामचंद्रपंत अमात्य, आज्ञापत्र ग्रंथात म्हणताल की चालीच्या गुराबा बहुत थोर ना बहुत लहान पेशा मध्यम रीतीने सजाव्या तैसीच गलबते करावी थोर बरसे परगात वाचावीणे प्रयोजनाचेच नव्हेत. याचाच अर्थ मोठ्या आकाराची गलबते ही वाऱ्यावीना निरूपयोगी ठरले.

प्रा. जयसिंगराव पवार यांच्या मते मोठी लढाऊ जहाजे बांधण्यासाठी लागणारे तंत्रज्ञान मराठ्यांच्यापाशी नव्हते. असे तंत्रज्ञान देण्यास युरोपियन लोक फारसे राजी नव्हते त्यातच महाराजांचे आरमार निर्मिती मागील मुख्य ध्येय शत्रूपासून प्रजेचे रक्षण करण्याचेच होते.

Scanned by CamScanner

GoodLuck Page No.
Date

## २) जहाजांचे प्रकार :

शिवकाळातील नावीक कामगिरीशी आणि बांधलेल्या लढाऊ जहाजांच्या प्रकाराची बखर वाङ्मयात अगदीच त्रोटक स्वरूपात माहिती दिली आहे. कृष्णाजी अनंत सभासद महाराजांच्या नावीक दलातील जहाजांची नावे गुराब, तरांडी, तारू, शिबाड, पगार आणि इतर अशी देतो. मल्हार रामराव चिटणीस हा बखरकार वरील यादीत कापवा, बचोर आणि पाल या नावांचा समावेश करतो. याखेरीज मराठ्यांच्या इतिहासाच्या अस्सल साधनांपैकी सिलेक्शन फ्रॉम द पेशवा दप्तर, इतिहास संग्रह आणि मराठ्यांच्या इतिहासाची साधने यावरून मराठ्यांच्या आरमारासंबंधी विस्तृत माहिती मिळते.

## ३) जहाजांची संख्या :

सभासद बखरीत महाराजांच्या आरमारातील जहाजांची संख्या 700 इतकी, चिटणीस बखरीत ४०० ते ५०० इतकी तर चित्रगुप्त बखरीत ६४० इतकी दिली आहे. शिवाजी राजांच्या कल्याण भिवंडी येथील जहाजे बांधण्याच्या कारखान्यास इ.स. १६५८ पर्यंत २० गलबतांचा ताफा तयार होता. तो पुढे 1664 पर्यंत 70 आरमारी जहाजांचा ताफा बनला. बखरीत दिलेली संख्या गैरसमज निर्माण करणारी आहे. तत्कालीन इंग्रज आणि पोर्तुगीज साधनावरून असे दिसते की मराठा आरमारात 150 च्या आसपास जहाजे असावीत.

## ४) आरमार दलाची रचना :

शिवछत्रपतींच्या आरमार दलाच्या रचनेबाबत रामचंद्रपंत अमात्य आज्ञापत्र या ग्रंथात म्हणतात की, प्रत्येक सुभे करावे तर सुभेयास पाच गुराबा पंधरा गलबते करून द्यावी. इत यास एक सरसुभा करावा, म्हणजेच प्रत्येक आरमारी सुभ्यात (विभागात) 5 गुराबा आणि 15 गलबते त्याला एक सुभा असे म्हणावे. अशाप्रकारे अनेक आरमारी सुभे असत. प्रत्येक आरमारी दलावर एका आरमारी अधिकाऱ्याची नेमणूक केली जाई. शिवाजी महाराजांच्या आरमारात मयानाईक आणि दर्यासारंग ही प्रमुख केंद्रे पदे होती. महाराज मायनाईक या पदावर भंडारी जातीतील तर दर्यासारंग हे मुसलमान जातीतील अधिकाऱ्याची नेमणूक करत. शिवरायांनी आपल्या आरमारावर दर्यासारंग म्हणून दौलतखान यांची नेमणूक केली.

शिवाजी महाराजांनी कोकण किनाऱ्यावरील कोळी, भंडारी मलबारी इ. जातीजमातील लोकांची खलाशी म्हणून नेमणूक केली. त्यांनी वरील जातीतील लोकांच्या सागरी अनुभवाचा, धाडसवृत्तीचा फायदा आरमाराच्या उभारणीसाठी करून घेतला. आरमारात कोळी, भंडारी, गावित, भोई, पाळंदे इत्यादींचा भरणा असे.

Scanned by CamScanner

४) आरमार बांधणी आणि सागरी किल्ले:

कोकणातील कल्याण - भिवंडी शिवाजीने काबीज केल्यावर आरमार बांधणीचा उद्योग सुरु केला. वसईस जहाज बांधण्यात कुशल अशा कारागीरांच्या मदतीने आपल्या लढाऊ जहाज बांधण्याचा उद्योग सुरु केला जहाज बांधणीच्या उद्योगात तीनशेचाळीस पोर्तुगीज कारागीर व इतर लोक काम करत. जहाज बांधणीसाठी उपयुक्त बंदरे, सागवान आणि स्थानिक आणि स्थानिक कारागीर उपलब्ध झाल्याने जहाज बांधणी आणि दुरुस्ती कामाने वेग घेतला होता.

आपल्या आरमाराचे रक्षण होण्यासाठी आणि किनार किनारपट्टीतील रयतेच्या संरक्षणासाठी विजयदुर्ग, सुवर्णदुर्ग, सिंधुदुर्ग इत्यादी सागरी किल्ले बांधले. सिंधुदुर्ग किल्ल्यांच्या बांधकामावर महाराजांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. मराठा आरमारामुळे पोर्तुगीज, इंग्रज व सिद्धीसारख्या शत्रूवर धाक निर्माण झाला. सन 1667 मध्ये शिवाजींच्या सामर्थ्याबाबत विजरई कोंदी द सांव्हिसेंती आपल्या पत्रात नमूद करतो की, शिवाजींचे नौदलही मला भीतीदायक वाटते. कारण. कारण त्यांच्याविरुद्ध आम्ही सुरुवातीस कारवाई न केल्यामुळे त्यांनी किनाऱ्यावर किल्ले बांधले आणि आज त्यांच्याजवळ पुष्कळ तारवे आहेत. पण ही तारवे मोठी नाहीत.

५) व्यापारी आरमार:

कोकण किनाऱ्यावरील चौल, कुलाबा, ठाणे, राजापूर यासारखी व्यापारी बंदरे महाराजांच्याकडे होती. या व्यापारी बंदरातून अरब देशाशी व्यापार चाले, अरबी आणि युरोपियन व्यापारी जहाजे कोकणातील व्यापाऱ्यांशी देवघेव करत असत. परकिय व्यापाऱ्यांना लाकूड, पाणी, नारळाचे बहाळे, अन्नधान्य अशा जिन्नस विकत द्यावेत. एवढेच नव्हे तर परकिय व्यापारी जहाजांचे संरक्षण करावे याबाबत आज्ञापत्रात महाराजांनी आपल्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. परंतू शत्रूची जहाजे जप्त केली जात असत.

GoodLuck Page No.
Date

## • शिव छत्रपतींचे आरमारी धोरण :

रामचंद्रपंत अमात्य यांच्या आज्ञापत्रातून महाराजांचे आरमार विषयक धोरण विशद करता येते त्यातील प्रमुख बाबी पुढीलप्रमाणे:

1) आरमारावर मर्द लोकांची नेमणूक करावी. तोफा, बंदुका आणि दारुगोळा ठेवावा. होकायंत्रे असावीत.

2) प्रत्येक सुभ्यात अथवा विभागात 5 गुराबा आणि 15 गलबते असावी.

3) आरमारातील सेवकांचा, अधिकाऱ्यांचा पगार हा मुलुखाच्या उत्पन्नातून भागवावा. तो पेदास्तीतून म्हणजेच बंदरातील व्यापारी मालावरील जकात अथवा उत्पन्नातून देऊ नये. कारण त्यामुळे व्यापाऱ्यांना उपद्रव होतो. परिणामी त्यांच्या व्यापारावर व व्यापारी बंदरावर दुष्परिणाम होतो.

4) जसे सोयीचे होईल तसे आरमार निर्माण करावे. आरमारातील लोकांनी सतत सागरावर गस्त घालून शत्रूचे पारिपत्य करावे.

5) सागरी किल्ल्यांवर वरचेवर दारुगोळा आणि सामान पाठवावे. सदासर्वदा सागरावरील दर्यावर्दी शत्रूची बातमी काढून शत्रूचा मुलुख लुटावा.

6) ज्या व्यापाऱ्यांना परवाना अथवा दिले असेल त्यांच्या जहाजांना व्यापार करण्यास मुभा द्यावी.

7) विनापरवानाधारक परकीय व्यापारी जहाजे आसल्यास त्यांना लागणारे साहित्य द्यावे. त्यांच्याकडून थोडीबहुत जकात घेऊन त्यांना जाऊ द्यावे.

युद्धप्रसंगावेळी सर्वांनी शिकस्त करून एकत्र जमावे. शत्रूला दमवून त्यांच्याशी लढावे. वाऱ्यामुळे शत्रू न दमला व आपणच दमलो तेव्हा आपली गलबते वाऱ्यामुळे चालत नसतील तेव्हा आले बळ कसेही असो शत्रूची फळी फोडत फोडत किल्ल्यांचा आश्रय घ्यावा. तांडा व आपल्या लोकांस दगा होईल असे करू नये. शत्रू दमून जेरीस आला म्हणून एकदम त्याच्यावर व तुटून पडू नये. शत्रूस लोटून दुरून घेरून तोफांचा मारा करावा. शत्रू दगाबाज असल्यास त्याजवर विश्वास न ठेवता त्याचे जहाज फोडून टाकावे. आरमाराचे तळ दरवर्षी वेगळ्या ठिकाणी ठेवण्याबद्दल सूचना केलेली दिसते. सागरात वादळ होण्यापूर्वी आरमार छावणी करावी. ती दरवर्षी एकाच सागरी किल्ल्याजवळ अथवा उघड्यावर करू नये. कारण शत्रू हा विश्वासू ठेवण्यास योग्य नसतो.

आपल्या आरमारास लागणारे तख्ते, स्पोट, डोलकाठ्या यासारखे लाकूड हुजूर परवानगीने राज्याच्या जंगलातून तोडून न्यावे. याशिवाय लाकूड विकत घ्यावे.

Scanned by CamScanner

GoodLuck | Page No.
Date

• महाराजांच्या नावीक दलाची कामगिरी.

1) शिवाजीमहाराजांनी मोठ्या दुरदृष्टीने फारसे राजकीय सामर्थ्य नसताना मराठ्यांचे आरमार स्थापन करून ते मराठा आरमाराचे जनक बनले ही बाब खरोखरच अभिमानास्पद होय.

२) शिवाजी महाराजांनी आरमार स्थापन करून कोकणातील प्रजेचे सिद्दी, पोर्तुगीज अशा शत्रूंच्या आक्रमणापासून रक्षण केले.

३) आरमारामुळे चालणाऱ्या व्यापारास व हिंदी व्यापारी जहाजांना संरक्षण प्राप्त झाले.

४) आरमार उभारणीमुळे मराठ्यांची सागरावर सत्ता निर्माण झाली. सागरात फुटून किनाऱ्यावर लागलेल्या जहाजावर व मालावर मराठ्यांना आपला हक्क सांगता येऊ लागला.

5) पोर्तुगीज परवान्याशिवाय मराठ्यांची जहाजे, समुद्रावर संचार करू लागली.

6) जलदुर्गामुळे मराठ्यांना नाविक दलाचे तळ निर्माण करता आले. परिणामी मराठा नावीक दलाच्या सामर्थ्यात भर पडली आणि त्यामुळे सिद्दी, पोर्तुगीज, इंग्रज आरमारावर धाक निर्माण झाला.

7) आरमारामुळे युद्धमोहिमेमुळे मराठा लष्करास मदत करणे सोपे झाले. त्यांना अन्नधान्य, दारूगोळा आदींची रसद पोहचविता आली.

८) आरमार स्थापनेमुळे कठीणसमयी आश्रय घेण्यासाठी आणखी एक सुरक्षित ठिकाण महाराजांना मिळाले.

९) जलदुर्ग आणि जहाजबांधणीचा उद्योग सुरू केल्याने अनेकांना रोजगार किंवा नोकऱ्या मिळाल्या त्यांच्या दर्यावर्दीपणात वाढ झाली.

Scanned by CamScanner